ऐक्य

# वारीतील महिलांना आवश्यक सुविधा मिळण्यासाठी आरोग्य वारी उपक्रम : सौ. चाकणकर

▲ फलटण, दि. १७ : जगद्गुरू तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी असणाऱ्या महिलांना आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुविधा प्राधान्याने मिळाल्या पाहिजेत, यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग प्रयत्नशील असून त्याचाच एक भाग म्हणून गतवर्षीपासून आषाढी वारी दरम्यान आरोग्य वारी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोगाच्या अध्यक्षा सौ. रूपाली चाकणकर यांनी सांगितले.

पालखी सोहळ्यातील महिला वारकऱ्यांसाठी महाराष्ट्र महिला आयोगाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या आरोग्य वारी उपक्रमाचा शुभारंभ आणि महिलांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांचा महाराजा मंगल कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी आ. दीपक चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, स्वयंसिद्धा महिला संस्था समूहाच्या प्रमुख अ‍ॅड. सौ. मधुबाला भोसले, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ. रेश्मा भोसले, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, फलटणचे प्रांताधिकारी सचिन ढोले, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस, फलटणचे तहसीलदार समीर यादव, खंडाळ्याचे तहसीलदार अजित पाटील, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) सौ. रोहिणी ढवळे, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा) सौ. क्रांती बोराटे, प्रभारी गट विकास अधिकारी सतीश कुंभार, गटविकास अधिकारी, नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी संजय गायकवाड, बालविकास प्रकल्प अधिकारी भरत कोळेकर व शंकर इंगळे, बाल विकास प्रकल्प आधिकारी, खटाव किरण उदमले, बाल विकास प्रकल्प अधिकारी खंडाळा मिलिंद भोईटे, माजी सभापती सौ. रेश्मा भोसले, माजी नगरसेविका सौ. प्रगती कापसे, सौ. रेश्मा देशमुख, सौ. राजश्री शिंदे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, विविध महिला मंडल पदाधिकारी, ग्रामपंचायत महिला सरपंच, सदस्या यांच्यासह महिला उपस्थित होत्या.




बोलताना सौ. रूपाली चाकणकर, व्यासपीठावर मान्यवर. (कवितके)

सातारा, सोलापूर हे भाग्यवान जिल्हे असून जगद्गुरू तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखी सोहळे आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे या जिल्ह्यातून मार्गक्रमण करतात. त्यामध्ये सहभागी लक्षावधी वारकरी, दिंडीकरी, भाविकांसाठी विविध सोयी सुविधा आपण देत आलो आहोत. तथापि, त्यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी असणाऱ्या स्त्रियांचा विचार यापूर्वी कधी झाला नसल्याने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून गतवर्षीपासून आपण आरोग्य वारी उपक्रमाद्वारे वारीतील महिलांसाठी हिरकणी कक्षाच्या माध्यमातून लहान मुलांसाठी पाळणा, खेळणी, स्तनदा मातांसाठी बाळाला दूध पाजण्याची व्यवस्था केली आहे. वारी दरम्यान मासिक पाळीला सामोरे जावे लागले तर सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देण्याबरोबर वापरलेल्या सॅनिटरी नॅपकीनची विल्हेवाट लावण्यासाठी खास मशीनद्वारे ते नष्ट करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. महिला वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती, अडचणीच्या काळात १०९१ क्रमांकावर संपर्क केल्यास तातडीने पोलीस संरक्षण, पालखी तळावर आणि परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह आणि स्नानगृहांची स्वतंत्र व्यवस्था, वैद्यकीय उपचारांची गरज असेल तर त्यासाठी आवश्यक डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी, पुरेशी औषधे उपलब्ध करून देण्यात येणार असून सोहळ्यातील महिलांनी या सर्व सुविधांचा वापर करावा, असे आवाहन सौ. रूपाली चाकणकर यांनी केले.

या उपक्रमांतर्गत सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग व सॅनिटरी नॅपकिन बर्निंग मशीन, स्त्री रोगतज्ञ, चेंजिंग रूम, सर्व दर्शनी भागात महिला सुरक्षा हेल्पलाइन क्रमांक, दर १० किलोमीटर अंतरावर विसावा कक्ष, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष तसेच निर्भया पथक आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कोरोना काळामध्ये फलटण तालुक्यातील आशा, अंगणवाडी सेविका व मदतनिसांनी जे काम केले ते विसरता येणार नाही. कोरोनासारख्या अत्यंत कठीण परिस्थितीत या सर्व भगिनी प्रत्येक घरामध्ये जावून सर्वांची विचारपूस करत आपली सेवा बजावत होत्या. आता आषाढी वारीमध्ये त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्या निश्चित उत्तम पद्धतीने पार पाडतील, असा विश्वास श्रीमंत संजीवराजे यांनी व्यक्त केला.

महिला आयोगाच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेला आरोग्य वारी हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून याचा फायदा वारीमधील महिला वारकरी भगिनींना होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. दीपक चव्हाण यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी जीवन गलांडे, सचिन ढोले, राहुल धस, ढवळे व संजय गायकवाड यांनी आढावा सादर केला. पर्यवेक्षिका कोमल फुले यांनी सूत्रसंचालन केले. बालविकास प्रकल्प अधिकारी भरत कोळेकर यांनी आभार मानले.